# 'ग्रामलोक' कार्यक्रमातून लोककलाकार, साहित्यिकांना प्रोत्साहन

## डॉ. पूर्णानंद च्यारी यांचे उद्‌गार, ग्रामपंचायत तुये व कोकणी कलामाची पेडणे यांच्या संयुक्त विद्यमाने तुये येथे 'ग्रामलोक' कार्यक्रम

प्रतिनिधी
पेडणे

मौखिक साहित्य ते अक्षर साहित्य यांच्यात सेतू उभारण्याचे काम ग्रामलोक कार्यक्रमातून साहित्य अकादमी देशभरात करत असून त्यातून ग्रामीण भागातील लोककलाकार व साहित्यिकांना प्रोत्साहन मिळते असे उद्‌गार प्रसिद्ध साहित्यिक व साहित्य अकादमीच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. पूर्णानंद च्यारी यांनी काढले. डॉ. च्यारी ग्रामपंचायत तुये व कोकणी कलामाची पेडणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रामलोक कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर तुयेच्या सरपंच अनिता आनंद साळगावकर, उपसरपंच मनोहर पेडणेकर, पंचसदस्य सुलक्षा नाईक व स्वीटी नाईक उपस्थित होते



**पेडणे : 'ग्रामलोक' कार्यक्रमात बोलताना अध्यक्ष डॉ. पूर्णानंद च्यारी सोबत तुयेच्या सरपंच अनिता आनंद साळगावकर, शशिकांत पुनाजी, उपसरपंच मनोहर पेडणेकर, पंचसदस्य सुलक्षा नाईक व स्वीटी नाईक आदी.**

तुयेचे पंचसदस्य उदय मांद्रेकर यांनी ग्रामपंचायतीतर्फे सर्वांचे स्वागत केले. साहित्य अकादमीच्या कोकणी सल्लागार मंडळाचे सदस्य कवी शशिकांत पुनाजी यांनी प्रास्ताविक भाषणात 'ग्रामलोक' कार्यक्रमाची संकल्पना मांडली. त्यानंतर झालेल्या साहित्य सादरीकरण सत्रात संतोष महाले यांनी कथाकथन, प्रा. प्रियांका परब यांनी लोकसाहित्य व लोककला यावर विवेचन केले. जॉकिम फर्नांडिस यांनी नाट्य सादरीकरण तर अद्वैत साळगावकर यांनी पेडणे कोकणी शैलीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. सायली आजगावकर यांनी काव्यवाचन केले.

मैथिली शामसुंदर च्यारी यांनी गायलेल्या नमनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. अशोक नाईक यांच्या नेतृत्वाखाली लोककलाकारांनी रोमट सादर केले. काजरेश्वर सेल्फ हेल्प ग्रुपने फुगडी तर मांगीरीश विद्यालय आरोबा व सरकारी प्राथमिक शाळा मधलावाडा पार्से यांनी लोकनृत्ये सादर केली. सूत्रनिवेदन रशी परब तर कोकणी कलामाची पेडणेचे अध्यक्ष प्रकाश तळवणेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास पंचक्रोशीतील २०० लोक सहभागी झाले.